पोलीस निरीक्षक, यवत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय
यवत ता.दौंड जि.पुणे
दुरध्वनी क्रमांक:-०२११७-२६२३१४
ई मेल– piyavat.pnr@mahapolice.gov.in

प्रेस नोट दि. १५/१०/२०२६

'' अखेर डाळिंब येथील खूनाच्या गुन्हयाची उकल, आरोपी जेरबंद :- यवत पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखेची संयुक्त कामगिरी ''

दि. ०३/१०/२०२६ रोजी सायं. ०६:०० वा. च्या सुमारास मौजे डाळिंब ता.दौंड जि.पुणे गावाचे हदिदतील महिला नामे नंदा धोंडीबा खंडागळे, वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.डाळींब ता.दौंड जि.पुणे यांचे राहते घरातून त्यांचा मुलगा नामे भिमाशंकर धोंडीबा खंडागळे, वय ३५ वर्षे, रा. डाळिंब ता.दौंड जि.पुणे यास कोणीतरी अज्ञात कारणांसाठी अपहरण केल्याबाबत यवत पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १०१२/२०२६ भा.न्या.सं.कलम १४०(३) अन्वये तक्रार दिलेली होती. सदर गुन्हयाचा तपास सुरू असताना दि. ०८/१०/२०२६ रोजी मौजे डाळिंब ता.दौंड जि.पुणे गावच्या हदिदत रमेश म्हस्के यांचे विहिरीत फिर्यादी यांचा मुलगा भिमाशंकर धोंडीबा खंडागळे याचा मृतदेह मिळून आला. त्यावेळी भिमाशंकर खंडागळे यास कोणीतरी अज्ञात इसमाने,अज्ञात कारणासाठी पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने त्याचे हातपाय लोखंडी तारेने बांधून व मृतदेहास मोठा दगड बांधून विहिरीत फेकून खून केला असल्याचे निषन्न झाले. त्यानंतर सदर गुन्हयात भा.न्या.सं.कलम १०३(१),२३८ अशी कलमवाढ करून त्याअनुषंगाने अधिक तपास सुरू केला.

दि.१५/१०/२०२६ रोजी गुन्हयाचे तपासादरम्यान संशयित इसम विजय सुभाष लेचरूड, वय ४० वर्षे, रा. डाळिंब ता.दौंड जि.पुणे यास ताब्यात घेवून गुन्हयाचे अनुषंगाने अधिक विचारपूस केली असता इसम नामे भिमाशंकर धोंडीबा खंडागळे, वय ३५ वर्षे, रा. डाळिंब ता.दौंड जि.पुणे याने त्यास किरकोळ शिवीगाळ केल्याने त्याचा राग मनात धरून त्याने भिमाशंकर याचा गळा दाबून खून केला. त्यानंतर भिमाशंकर याचे हात-पाय लोखंडी तारेने बांधून त्याच्या मृतदेहास मोठा दगड बांधून पुरावा नष्ट करण्याच्या उददेशाने विहिरीत फेकून दिले असल्याची कबुली दिली. त्यावेळी आरोपी विजय सुभाष लेचरूड, वय ४० वर्षे, रा. डाळिंब ता.दौंड जि.पुणे यास गुन्हयाचे तपासकामी अटक करण्यात आलेली असून सदर गुन्हयाचा पुढील अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अक्षय मोरे करित आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक मा. श्री. संदिपसिंह गिल, अपर पोलीस अधिक्षक पुणे विभाग मा.श्री. डॉ.शुभम कुमार, अपर पोलीस अधिक्षक बारामती विभाग मा. श्री. गणेश बिरादार व उपविभागीय पोलीस अधिकारी, दौंड मा.श्री.बापुराव दडस यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक मा.श्री. प्रमोद क्षिरसागर, यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा.श्री. संतोष तासगांवकर, सहा. पोलीस निरीक्षक नितीन अतकरे, पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड, पोलीस उपनिरीक्षक अक्षय मोरे, पोलीस उपनिरीक्षक दशरथ नंदीवाले, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर राउत (स्था.गु.शा.) श्रे.पोलीस उपनिरीक्षक बाळासो थिकोळे, पो.हवा. संदीप देवकर, पो.हवा. सुहास देवकाते, पो.कॉ. मारूती बाराते, पो.कॉ. प्रतिक जगताप, पो.कॉ. धिरज जाधव, पो.कॉ.अमोल भुजबळ, पो. कॉ.सचिन गुंड, पो.कॉ. प्रतिक गरूड, पो.कॉ.विनीत कु-हाडे, पो.कॉ.दिनेश लोणकर, सफौ. सचिन घाडगे (स्था.गु.शा.), सफौ. आसिफ शेख (स्था.गु.शा.), पो.हवा.गुरूनाथ गायकवाड (स्था.गु.शा.), पो.हवा.सुभाष राउत (स्था.गु.शा.), पो.हवा.विकास कापरे (स्था.गु.शा.) यांचे पथकाने केली.